2026040212123534

**T&C Division**
**1st August 2025**

**Sub: Implementation of Automated Rapid Transit System (ARTS)/Personal Rapid Transit System in BKC on PPP Basis: Initiation of Rehabilitation and Resettlement (R&R) Survey Activities**

MMRDA has undertaken the implementation of an Automated Rapid Transit System (Personalised Rapid Transit System) in BKC, Mumbai. This will enable first & last -mile connectivity from Bandra & Kurla Suburban Station to BKC. Automated Rapid Transit is an electric-powered, autonomous transport system. It is also known as a pod car, which is a public transport mode featuring small, automated cars of 3-6 passenger capacity. The proposed alignment length is 8.85 km and alignment starts from Kurla Suburban Station and passing through BKC the business hub and meeting at Bandra Suburban Station. It will cater to the issues of last mile connectivity to/from BKC to suburban railway stations (Bandra(E) & Kurla (W)).

The proposed PRT system will provide much needed connectivity to Bandra and Kurla Suburban Stations from Bandra Kurla Complex and integrating with ML-3 and ML-2B at ITO junction station. This will enable first and Last Mile Connectivity to/from Bandra & Kurla Suburban Railway stations. Automated Rapid Transit (ART) system is an electric-powered, autonomous transportation system. It is also known as a pod car, which is a public transport mode featuring small, automated cars of 4-6 passenger capacity. The **Total Length is** 8.85 km with 33 stations. The expected daily ridership is 1.12 lakhs by 2041. The stations are proposed at 200 m, making people to walk minimum from their offices. The alignment network plan is kept @1-3...C/s. The letter of acceptance was issued to M/s Sai Green Mobility Private Limited, Hyderabad on 10th September 2024 and Concessionaire Agreement was signed on 9th October 2024.

A review meeting was held under the chairmanship of Addl Metropolitan Commissioner-2 on 15th July 2025 wherein the modified alignment and stations were agreed. Since, the modified alignment is passing through the congested areas of Kurla and Bandra, R&R needs to be taken up. The alignment network plan imposed on DP is attached herewith. // 5 C/s

In this context, Social Development Cell is requested to undertake necessary surveys and further needful course of actions please. for portion shown in map @ 1-3 C/s.

Submitted Please.

DTE (VB) 1/8/25

TE(RW)

[P.T.O.]

Scanned with OKEN Scanner

Subject: R&R Survey @ Kurla & Bandra.

AC (SG)-A/C
[signature]
1.8.2025

Chief (T&C)
Date 01/08/2025
No. 411
Time

Director (Projects)-MPIU - on leave

Chief, SDC
Dy. Coll[r]. (RA)
[signature]
4/8/2025

6748
01/08/2025

Bhavesh Joshi
[signature]
14/8/25

File Received in
18-8-2025
[signature]
Joshi B.V.

सामाजिक विकास कक्ष
दि. २१ ऑगस्ट, २०२५

**विषय** : वांद्रे - कुर्ला संकुलामध्ये स्वयंचलित जलद सार्वजनिक वाहतूक परिवहन (Automated Rapid Transit System) प्रकल्पाच्या प्रकल्पबाधित सर्वेक्षण व पुनर्वसनास मान्यता मिळणेबाबत.

**संदर्भ** : १) सवलतदार यांच्याशी झालेला करारनामा दि.०९/१०/२०२४.पृष्ठ क्र.१५ अट क्र.४.१.२ (क)

२) परिवहन व दळणवळण विभागाची टिपण्णी दि. ०१/०८/२०२५.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून वांद्रे – कुर्ला संकुलाचा जागतिक स्तर उंचावण्याच्या दृष्टीकोनातून वांद्रे व कुर्ला या रेल्वे स्थानकाच्या शक्य तितक्या जवळ जोडणी करण्याच्या दृष्टीने वांद्रे - कुर्ला संकुलात स्वयंचलित जलद सार्वजनिक वाहतूक (Automated Rapid Transit / Personal Rapid Transit) ची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने परिवहन व दळणवळण विभागामार्फत सल्लागार नेमूण त्याच्या माध्यमातून सखोल अभ्यास करुन सल्लागारांनी स्वयंचलित सार्वजनिक वाहतूक प्रणालीची अंमलबजावणी करण्याबाबत प्राधिकरणास अहवाल सादर केलेला आहे. स्वंयचलित वाहतूक प्रणालीची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे :

| अ.क्र. | वर्णन | माहिती |
|---|---|---|
| १. | एकूण लांबी | ८.८० कि.मी. |
| २. | एकूण स्थानके | ३३ |
| ३. | वेग | ४० कि.मी. प्रति तास (कमाल) |
| ४. | प्रकल्पाची किंमत | रु. १०१६.३८ कोटी (भूसंपादन, सेवा वाहिन्या, पुनर्वसन व पुनर्वसाहतसहित २०२३ च्या भाव पातळीनुसार आणि जमीन भाडे व डेपो जमीन किंमत वगळून |
| ५. | प्रवासी भाडे | रु. २१ प्रति कि.मी. (वर्ष २०२२ च्या भावपातळीनुसार) (प्रवास सेवा सुरु झाल्यानंतर प्रति वर्ष ५% ने वाढ) |
| ६. | (POD) वाहनांचे वैशिष्ट्ये | लांबी – ३.७ मी.<br>रुंदी – १.४७ मी.<br>उंची – १.८ कि.मी. |
| ७. | प्रवासी क्षमता | ६ प्रवासी प्रति. पॉड |
| ८. | स्थानक वैशिष्ट्ये | साधारण: लांबी – ३५ मी.<br>रुंदी – ५.५ मी. |
| ९. | डेपो (प्रस्तावित) | ५००० स्केअर मी. (वांद्रे-कुर्ला संकुल) |
| १०. | वार्षिक प्रवाशी संख्या | वर्ष २०३१ – १.०९ लाख<br>वर्ष २०४१- १.१२ लाख |
| ११. | समभाग वित्तीय परतावा (Equity IRR) | १९.०७% |
| १२. | अंमलबजावणीचा प्रकार | **सार्वजनिक- खाजगी – भागिदारी (PPP)** |

Scanned with OKEN Scanner

३२१/१५

परिवहन व दळणवळण विभागामार्फत प्राप्त टिपण्णी नुसार प्रकल्पबाधितांचे सर्वेक्षण करावयाचे आहेत नस्ती सोबत नकाशे जोडलेले आहेत संबंधित प्रकल्पबाधितांचे सर्वेक्षण करावयाचे झाल्यास प्रकल्पबाधितांसाठी सर्वेक्षण व पुनर्वसनाबाबत जी कार्यपध्दती निश्चित केलेली आहे त्या कार्यपध्दतीनुसार सर्वेक्षण होणे आवश्यक आहे. आपल्या सुलभ संदर्भासाठी कार्यपध्दत नस्ती मध्ये संलग्न केलेली आहे. कृपया त्याचे अवलोकन व्हावे. **सर्वेक्षणाची मागणी पत्र (Demand Note)** एका विहित नमूण्यात देणे आवश्यक आहे. त्यासोबतच खालील काही मुद्यांचे सुध्दा स्पष्टता देणे आवश्यक आहे.

७१८५-
१७१८५

१. आपल्या मागणी पत्रात ज्या ठिकाणी सर्वेक्षण करावयाचे आहे अशा क्षेत्राचा उल्लेख करण्यात यावा.
२. प्रकल्पाशी संबंधित मध्यगेपासून दोन्ही बाजूस किती मीटरपर्यंत सर्वेक्षण करावयाचे आहे याचा स्पष्ट उल्लेख नमूद करण्यात यावा.
३. प्रकल्पासंबंधित स्टेशन आगमन व निर्गमन वा Viaduct यापैंकी कोणंत्या बाबीसाठी सर्वेक्षण करावयाचे आहे याचा स्पष्ट उल्लेख टिपणीत करण्यात यावा.
४. Station Box, Fire Safety, Escalator, Lift, Shifting of Monopole, etc. यापैंकी कोणत्या बाबीसाठी सर्वेक्षण करावयाचे आहे याचा स्पष्ट उल्लेख आपल्या टिपणीत असावा.
५. आपण दिलेल्या टिपणीतील नकाशे हे स्केल नुसार नाही. नकाशे स्केल नुसार देण्यात यावे. तसेच नकाशांवर सल्लागार, डिडिसी यांचे स्वाक्षरी व शिक्के तसेच आपल्या विभागाचे परिवहन उपअभियंता परिवहन अभियंता यांच्या सुध्दा स्वाक्षरी देऊन फेर सादर करावे.
६. भूसंपादन व प्रकल्पबाधितांचे सर्वेक्षण हे दोन्ही नकाशे स्वत्रंपणे सादर करावे.
७. आपल्या नस्ती सोबत मा. महानगर आयुक्त यांनी मान्यता दिलेली संरेखना, आराखडा नस्ती सोबत सादर करावा.
८. ज्या ठिकाणी सर्वेक्षण करावयाचे आहे अशा जागेचे सिमांकन सर्वेक्षण संस्थेस देण्यात यावे.
९. आपल्या सल्लागार मार्फत ड्रोण सर्वेक्षण, व्हिडिओ शुटिंग सर्वेक्षण करते वेळी तसेच सर्वेक्षण करण्यआधी, सर्वेक्षणानंतर व निष्कासनानंतर करण्यात यावे.

Chief (T&C)
Date 26/08/2025
No. 411
Time

वरीलप्रमाणे अनुक्रमांक १ ते ७ बाबतची पुर्तता करुन नस्ती या कार्यालयास पाठवण्यात यावी. मुद्दा क्र. ०८ व ०९ सर्वेक्षण करते वेळी सिमांकनाबाबत व्हिडिओ शुटिंग व ड्रोण सर्वेक्षण आहे. वरील मुद्यांची पुर्तता झाल्यानंतर या विभागामार्फत पुढील कार्यवाही करण्यात येईल. सदर नस्ती संचालक प्रकल्प यांच्याकडे पाठवण्यास मान्यता असावी.

26 AUG 2025

Bphadke
21/8/2025
उपजिल्हाधिकारी (श्रीमती. आखाडे)

21-8-2025
समाज विकास अधिकारी (श्री. जोशी)

Metro Project Implementation Unit
Date: 25 AUG 2025
Inward No. 11878

25/8/2025
प्रमुख सामाजिक ~~विकास~~ कक्ष

संचालक प्रकल्प (श्री. बसवराज)

Scanned with OKEN Scanner

33 अ/3

विषय : वांद्रे-कुर्ला संकुला मध्ये स्वयंचलित जलद सार्वजनिक वाहतूक परिवहन (Automated Rapid Transit System) प्रकल्पाच्या प्रकल्प बाधित सर्वेक्षण व पुनर्वसनास मान्यता मिळणेबाबत.

पृष्ठ क्रं: 32 अ/3 अनुसरुन, समाज विकास अधिकारी यांनी मागणी केल्या प्रमाणे प्रपत्र 32 अ/3 मधील अनुक्रमांक 1 ते 6 बाबतची पुर्तता करण्यात आली असून संबंधीत माहिती 29-53 c/s मध्ये सोबत जोडलेली आहे.

त्यास अनुसरुन, सामाजिक विकास कक्ष ह्यांना पुढिल ते योग्य कार्यवाही करण्यात विनंती करण्यात येत आहे.

मान्यतेसाठी सादर.

12-11-25

उप- परिवहन अभियंता (मा. वि. भ.)

परिवहन अभियंता (श्री वासनिक) 12/11/2025

आतिरिक्त प्रमुख (श्री गोंधळे) 12.11.2025

संचालक प्रकल्प (श्री. बस्वराज) 13/11

प्रमुख सामाजिक विकास कक्ष

Chief (T & C)
Date 12/11/2025
No. 411
Time

Dy. Dir. (RA)
17/11

B. Joshi
18/11/25

File Received on 18-11-2025

सामाजिक विकास कक्ष
आवक क्र. 3621
दिनांक 17/11/25

19-11-2025

Sir,

As discussed with TEE Rahul washind kindly provide information of point No 1 to 9 [page No 3/N S] as it Required as per PAP survey SOP for NA Pl.

Bphadtare 19/11/25
DC [RA]

19-11-2025

~~CSDC~~ 19/11

Addl. chief [Shri. ~~Jondhale~~]
TDC

TE (R/W)

for n/a pls
20/11/2025

As information requested by Social Development officer (SDO), the summary note for R&R for ARTS POD taxi project is prepared and kept @ 55 c/s for further necessary action.
Submitted please.

DTE (R/W)

Chief (T&C)
Date 20/11/25
No. 411
Time

Metro Project Implementation Unit
Date: 21 NOV 2025
Inward No. 11878
24 NOV 2025

TE (R/W) 21/11/2025

AC(SG) i/c

Dir. (P), M-PIU 21/11

~~CSDC~~ DC (R.A)

o/o

55/6

T&C Division
21st November,2025

## Summary Note for R&R Survey to be carried out for ARTS POD Taxi Project

1. Details of area need to be surveyed for R&R are as follows:

| Sr No. | Area to be surveyed | Nearest Landmark | Survey to be carried out for | Approximate length to be surveyed (m) | Maximum Average Survey width (m) | Average total area to be surveyed (Sq.m) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | New Mill road footpath | Police residential quarters, Kurla | Entry/Exit Structure | 100 | 5 | 500 |
| 2 | Behind Kurla Suburban Railway Station Boundary | Bhabha Hospital | Foot over bridge from ARTS Station to Kurla Suburban Railway station | 183.35 | 9.25 | 1696 |
| 3 | Near Indian Oil Corporation Limited building | IOCL building | ARTS Station | 94.75 | 24.00 | 2274 |
| 4 | Near Indian Oil Corporation Limited building | IOCL building | Viaduct | 75.26 | 27.90 | 2100 |

2. The area to be surveyed from centre line on both side is mentioned in attached drawing and varying depends on ARTS structure.
3. As mentioned above in Sr No. 1
4. As mentioned above in Sr No.1
5. The attached drawing is as per scale **1:750** mentioned in attached drawing.
6. Chainage is mentioned in attached drawing every 50 meters.
7. Signed and Stamp is mentioned in attached drawing.
8. Stamped of DTE, TE and STE is mentioned in attached drawing.
9. The above-mentioned area shall need to be surveyed only for Relocation and Rehabilitation (R&R) activity and there is no land acquisition required for this ARTS POD Taxi project.
10. The 282nd Executive Committee meeting held on 02nd September,2024 approved Minutes of meeting is kept with attached note.

DTE (VB) TE(RW) AC (SG)

Scanned with OKEN Scanner

सर्वेक्षणाचे मागणी पत्र (Demand Note) तपासणी करावयाच्या बाबी (Check list)

| अनु क्र. | मागणी पत्रासोबत जोडावयाचे कागदपत्रे | तपासणी |
|---|---|---|
| १ | सर्वेक्षण करावयाच्या क्षेत्राचा उल्लेख करण्यात आलेला आहे | होय |
| २ | ARTS पॉड टॅक्सी प्रकल्पाशी संबंधित मध्यगेपासून दोन्ही बाजूस किती मीटरपर्यंत सर्वे करावयाचा आहे याचा स्पष्ट उल्लेख आहे. | होय |
| ३ | ARTS पॉड टॅक्सी प्रकल्पासंबंधित स्टेशन आगमन व निर्गमन वा viaduct यापैकी कोणत्या बाबीसाठी सर्वेक्षण करावयाचे आहे याचा उल्लेख टिपणीत करण्यात आलेला आहे. | होय |
| ४ | Station Box, Fire safety, Escalator, Lift, Shifting of monopole, etc. यापैंकी कोणत्या बाबीसाठी सर्वेक्षण करावयाचे आहे याचा उल्लेख टिपणीत करण्यात आलेला आहे. | होय |
| ५ | मागणीपत्रा सोबत जोडण्यात आलेला नकाशा स्केलनुसार आहे याची खात्री करण्यात आलेली आहे. | होय |
| ६ | नकाशावर चेनेज नंबर नमूद केलेला आहे याची खात्री करण्यात आलेली आहे. | होय |
| ७ | नकाशावर DDC (Detailed design consultant) यांची स्वाक्षरी व शिक्के आहेत व त्याची तपासणी केलेली आहे. | होय |
| ८ | एमएमआरडीए परिवहन आणि दळणवळण विभाग यांच्या संबंधित कार्यकारी अभियंता, उप. अभियंता, कनिष्ठ अभियंता यांच्या स्वाक्षरी व शिक्के आहेत व त्याची तपासणी करण्यात आलेली आहे. | होय |
| ९ | भूसंपादन व प्रकल्पबाधितांचे सर्वेक्षण नकाशे हे दोन्ही नकाशे स्वतंत्र आहेत व त्याची खात्री केलेली आहे. | |
| १० | मागणीपत्रास मा. महानगर आयुक्त, मा. अति. महानगर आयुक्त, संबंधित प्रकल्पाचे काम करणारे संचालक, मुख्य अभियंता यांची मान्यता घेतलेली आहे व त्याची खात्री केलेली आहे. | होय |

टिप :- 1. तपासणी करावयाच्या बाबींमध्ये आवश्कतेनुसार x/v अशी नोंद दर्शविण्यात यावी.

12/11/2025

कार्यकारी अभियंता
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

परिवहन अभियंता
परिवहन व दळणवळण विभाग
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

BKC CONNECT PRIVATE LIMITED

Scanned with OKEN Scanner

सामाजिक विकास कक्ष
दि. ०४ नोव्हेंबर, २०२५

**विषय :** वांद्रे - कुर्ला संकुलामध्ये स्वयंचलित जलद सार्वजनिक वाहतूक परिवहन (Automated Rapid Transit System) प्रकल्पाच्या प्रकल्पबाधित सर्वेक्षण व पुनर्वसनास मान्यता मिळणेबाबत.

**संदर्भ :** १) मा. महानगर आयुक्त यांची प्रशासकिय मान्यता दि. ०५/०३/२०२४. 5/C

२) दै. लोकमत व दै. सकाळ वृत्तपत्रात ई-निवीदा मार्गविण्यासाठी प्रसिध्द करण्यात आलेली जाहिरात दि. ०६/०३/२०२४. 11/C - 13/C

३) प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला प्रस्ताव दि. २८/०८/२०२४. 15/C

४) प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीचा ठराव बैठक क्र. २८२ दि. ०२/०९/२०२४ मुद्दा क्र. १७. 23/C

५) प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीने दिलेल्या मान्यतेनुसार मे. साई ग्रीन मोबीलीटी प्रा.लि. यांना द्यावयाचे स्वीकृती पत्र (LOA) देण्यासाठी मा. महानगर आयुक्त यांनी दिलेली मान्यता दि. ०९/०९/२०२४. 29/C

६) मे. साई ग्रीन मोबीलीटी यांना दिलेले कार्यादेश दि. १०/०९/२०२४. 31/C

७) सवलतदार यांच्याशी झालेला करारनामा दि.०९/१०/२०२४.पृष्ठ क्र.१५ अट क्र.४.१.२ (क) 135/C

८) परिवहन व दळणवळण विभागाची टिपण्णी दि. १४/०८/२०२५. 33/C

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून वांद्रे – कुर्ला संकुलाचा जागतिक स्तर उंचावण्याच्या दृष्टीकोनातून वांद्रे व कुर्ला या रेल्वे स्थानकाच्या शक्य तितक्या जवळ जोडणी करण्याच्या दृष्टीने वांद्रे - कुर्ला संकुलात स्वयंचलित जलद सार्वजनिक वाहतूक (Automated Rapid Transit / Personal Rapid Transit) ची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने परिवहन व दळणवळण विभागाच्या माध्यमातून मा. महानगर आयुक्त यांनी दिलेल्या प्रशासकिय मान्यतेनुसार ई-निवीदा मागवण्यासाठी दैनिक सकाळ व दैनिक लोकमत या वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली होती. सदर जाहिरातीच्या अनुषंगाने प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या मंजूरीने व मा. महानगर आयुक्त यांनी दिलेल्या मान्यतेनुसार मे. साई ग्रीन मोबीलीटी यांची सवलतदार म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे. सदर सवलतदार यांच्याशी करारनामा करण्यात आलेला आहे.

प्राधिकरणाच्या परिवहन व दळणवळण विभागाच्यामार्फत सामाजिक विकास कक्षास दि. ०१/०८/२०२५ रोजी प्रकल्पबाधितांचे सर्वेक्षण व पुनर्वसन करण्याबाबत कळविलेले आहे. परिवहन व दळणवळण विभागाच्यामार्फत प्राप्त सवलतदार यांच्याशी झालेला करारनामा दि.०९/१०/२०२४.पृष्ठ क्र.१५ 135/C अट क्र.४.१.२ (क) याचे अवलोकन केले असता प्राधिकरणास प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन कुर्ला येथे करावयाचे आहे. त्यासाठी प्राधिकरणामार्फत सर्वेक्षणासाठी संस्था नेमूण त्यांच्या माध्यमातून सर्वेक्षण करावयाचे आहे. या सर्व कामासाठी येणारा खर्च सवलतदार मे. साई ग्रीन मोबीलीटी हे करणार आहेत असे नमूद आहे.

Scanned with OKEN Scanner

दि. २१/०८/२०२५ रोजी सवलतदार यांच्या सोबत प्रकल्पबाधित क्षेत्राचे प्रत्यक्ष स्थळपाहणी केली असता ३ ठिकाणी प्रकल्पबाधित क्षेत्र असल्याचे दिसून आले.

४. इंडियन ऑईल स्टेशन बांद्रा पूर्व – अंदाजीत प्रकल्पबाधित निवासी ७४, अनिवासी ५, इतर १.

५. कुर्ला टर्मिनल एफ ओ बी – अंदाजीत प्रकल्पबाधित निवासी ४०.

६. कुर्ला स्टेशनकडे जाणारा रस्ता – अंदाजीत प्रकल्पबाधित अनिवासी १२०.

सवलतदार यांच्याशी झालेल्या चर्चेनुसार कुर्ला स्टेशन जवळील पोलिस स्टॉफ कॉर्टस येथील जागा मिळाल्यास अनु.क्र. ३ ची आवश्यकता असणार नाही. असे चर्चे दरम्यान सांगण्यात आले उपरोक्त नमूद केलेले प्रकल्पबाधित संख्या अंदाजीत आहे. प्रत्यक्ष सर्वेक्षणानंतर बाधित प्रकल्पबाधितांची संख्या कळू शकेल.

स्वयंचलित जलद सार्वजणिक वाहतूक प्रकल्प (Automated Rapid Transit System) प्राधिकरणाच्या माध्यमातून सार्वजनिक- खाजगी – भागिदारी (PPP) तत्वावर अमंलबजावणी करण्यात येत आहे. प्रकल्पग्रस्तांचे सर्वेक्षण व पुनर्वसनासाठी खालील विषयांबाबत मंजूरी मिळणेबाबत विनंती आहे.

३. प्रकल्पग्रस्तांचे सर्वेक्षण करण्यासाठी स्वतंत्र सर्वेक्षण संस्थेची नेमणूक सवलतदार (CONCESSION AGREEMENT) यांच्या मार्फत करून त्यांच्याकडून प्रकल्पग्रस्तांचे सर्व्हेक्षण प्राधिकरणाच्या प्रकल्पांसाठी निश्चित केलेल्या सर्व्हेक्षण कार्यपद्धतीनूसार (SOP) नूसार करण्यात येईल याबाबत सवलतदारास पत्र देण्यात येईल.

४. प्रकल्पांतर्गत बाधित प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याकरीता गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रकल्प-१७००/सीआर३१/स्लम-२, दिनांक १२.१२.२००० अन्वये लागू असलेले एमयुटीपी (MUTP) पुनर्वसन धोरण सदर प्रकल्पासाठी लागू करण्याबाबत प्राधिकरणाच्या बैठकीत (Authority) मान्यता घेऊन पुनर्वसन धोरण लागू करण्यात येईल.

उपरोक्त अनु.क्र. १ व २ ची मान्यता मिळण्यास विनंती. सदर प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन सदनिका उपलब्धतेच्या अनुषंगाने करण्यात येईल.

प्रस्ताव मान्यतेसाठी तथा आदेशार्थ सादर.

समाज विकास अधिकारी (श्री. जोशी)

उपजिल्हाधिकारी (श्रीमती. आखाडे)

प्रमुख सामाजिक विकास कक्ष

संचालक प्रकल्प (श्री. बसवराज)

मा. अतिरिक्त महानगर आयुक्त - १

मा. महानगर आयुक्त

M C OFFICE No.:- 2451 Date:- 21/11/25
Metro Project Implementation Unit Date: 04 NOV 2025 Inward No. 15871 17 NOV 2025
सामाजिक विकास कक्ष 9115 दिनांक: 04/11/2025
Chief (T & C) Date 07/11/25 No. 558 Time
सामाजिक विकास कक्ष 9952 26/11/25
Addl. MC (I) & PD's Office No: 1547 Date: 17/11/2025
Scanned with OKEN Scanner

टिपणी :

सामाजिक विकास कक्ष/मुं.म.प्र.प्रि.प्र.
१२ फेब्रुवारी, २०२६

**विषय :** वांद्रे-कुर्ला संकुलामध्ये स्वयंचलित जलद सार्वजनिक वाहतुक परिवहन (Automates Rapid Transit System) प्रकल्पाने बाधित झोपडीधारकांना मुंबई नागरी परिवहन प्रकल्प धोरण (MUTP) लागू करणेबाबत.

**संदर्भ :** मा. महानगर आयुक्त यांची दि. २१/११/२०२५ रोजीची मान्यता.

मुंबई महानगर प्रदेशामध्ये दर्जेदार पायाभूत सुविधा निर्माण करण्याकरीता प्राधिकरणाने विविध महत्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतले असून त्यापैकी काही प्रकल्प पूर्णत्वास नेले आहेत. प्राधिकरण राबवित असलेल्या प्रकल्पांमध्ये प्रामुख्याने विविध मेट्रो मार्गिका,अटल सेतू, ऑरेंज गेट टनेल, शिवडी-वरळी उन्नत मार्ग इत्यादीचा समावेश आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून वांद्रे-कुर्ला संकुलाचा जागतिक स्तर उंचावण्याच्या दृष्टीकोनातून वांद्रे व कुर्ला या रेल्वे स्थानकाच्या शक्य तितक्या जवळ जोडणी करण्याच्या दृष्टीने वांद्रे-कुर्ला संकुलात स्वयंचलित जलद सार्वजनिक वाहतुक (Automates Rapid Transit System) ची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने व परिवहनव दळणवळण विभागाच्या माध्यमातून मा.महानगर आयुक्त यांनी दिलेल्या प्रशासकीय मान्यतेनुसार ई-निवीदा मागवण्यासाठी दैनिक सकाळ व दैनिक लोकमत या वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली होती. सदर जाहिरातीच्या अनुषंगाने प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या मंजूरीने व मा.महानगर आयुक्त यांनी दिलेल्या मान्यतेनुसार मे. साई ग्रीन मोबीलीटी यांची सवलतदार म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे. सदर सवलतदार यांच्याशी करारनामा करण्यात आलेला आहे.

प्राधिकरणाच्या परिवहन व दळणवळण विभागाच्यामार्फत सामाजिक विकास कक्षास दि.०१/०८/२०२५ रोजी प्रकल्पबाधितांचे सर्वेक्षण व पुनर्वसन करण्याबाबत कळविलेले आहे. परिवहन व दळणवळण विभागाच्यामार्फत प्राप्त सवलतदार यांच्याशी झालेला करारनामा दि.०९/१०/२०२४ अट क्र.४.१.२ (क) याचे अवलोकन केले असता प्राधिकरणास प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन कुर्ला येथे करावयाचे आहे. या सर्व कामासाठी येणारा खर्च सवलतदार मे. साई ग्रीन मोबीलीटी हे करणार आहेत असे नमूद आहे. दि.२१/०८/२०२५ रोजी सवलतदार यांच्या सोबत प्रकल्पबाधित क्षेत्राचे प्रत्यक्ष स्थळपाहणी केली असता ३ ठिकाणी प्रकल्पबाधित क्षेत्र असल्याचे दिसून आले.

- इंडियन ऑईल स्टेशन बांद्रा पूर्व- अंदाजीत प्रकल्पबाधित निवासी ७४, अनिवासी ५, इतर १
- कुर्ला टर्मिनल एफ ओ अी – अंदाजीत प्रकल्पबाधिता निवासी ४४
- कुर्ला स्टेशनकडे जाणारा रस्ता – अंदाजीत प्रकल्पबाधित अनिवासी १९

उपरोक्त नमूद केलेले प्रकल्पबाधित संख्या अंदाजीत आहे. प्रत्यक्ष सर्वेक्षणानंतर बाधित प्रकल्पबाधितांची संख्या कळू शकेल.

स्वयंचलित जलद सार्वजनिक वाहतुक प्रकल्प (Automated Rapid Transit System) प्राधिकरणाच्या माध्यमातून सार्वजनिक खाजगी-भागीदारी (PPP) तत्वावर अमंलबजावणी करण्यात येते आहे. प्रकल्पग्रस्तांचे सर्वेक्षण व पुनर्वसनाबाबत मा. महानगर आयुक्त यांनी दि.२१/११/२०२५ रोजी मान्यता दिलेली आहे.

प्रकल्पग्रस्तांचे सर्वेक्षण करण्यासाठी स्वतंत्र सर्वेक्षण संस्थेची नेमणूक सवलतदार(CONCESSION AGREEMENT) यांच्या मार्फत करुन त्यांच्या कडून प्रकल्पग्रस्तांचे सर्व्हेक्षण प्राधिकरणाच्या प्रकल्पांसाठी निश्चित केलेल्या सर्व्हेक्षण कार्यपध्दतीनुसार (SOP) नुसार करण्यात येईल याबाबत सवलतदारास दि. ०९/०१/२०२६ रोजी पत्र देण्यात आलेले आहे.

Scanned with OKEN Scanner

सदरील प्रकल्प हा प्राधिकरणाचा महत्वकांक्षी लोकोपयोगी प्रकल्प आहे. सद्याची परिस्थिती पाहता वांद्रे ते कुर्ला या ठिकाणी व्यावसायीक, शासकीय कार्यालये आहेत व सदरील कार्यालयामध्ये दररोज हजारोच्या संख्येने लोक येत असतात लोकांना सुलभ वाहतुकीने प्रवास सुकर होण्याकरीता प्राधिकरणाने हा महत्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला आहे.

सदर प्रकल्पग्रस्तांचे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प (MUIP) धोरणाने करावयाचे झाल्यास त्यांची पात्रता केवळ दि. ०१/०१/२००० च्या अर्हतेनुसार आवश्यक असणारी कागदपत्रे जसे की, उदा.विद्युत देयक, झोपडीगणना पावती, महापालिका मालमत्ता कर आकारणी, सहा. निबंधक यांचे कडील भाग प्रमाणपत्र, गुमांस्ता, उपहारगृह लायन्सस इत्यादी कागदपत्रांच्या पडताळणीच्या आधारे करावी लागेल व या प्रक्रियेस वेळ/विलंब होऊ शकतो तसेच जोपर्यंत झोपडीधारक पात्र ठरत नाही तोपर्यंत त्यांचे पुनर्वसन करता येणार नाही. अशा परिस्थितीत प्रकल्पाची निकड व महत्व लक्षात घेता या प्रकल्पाने बाधित झोपडीधारकांचे पुनर्वसन गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्र. प्रकल्प १७००/सी.आर-३१/स्लम-२, दि. १२/१२/२००० या शासन निर्णयानुसार लागू असलेले मुंबई नागरी परिवहन प्रकल्प (MUTP) धोरण लागू केल्यास प्रकल्पग्रस्तांची पात्रता लवकरात लवकर करुन त्यांचे त्वरीत पुनर्वसन करता येईल व प्रकल्पाचे काम जलद गतीने पूर्ण होईल.

यास्तव स्वयंचलित जलद सार्वजनिक वाहतुक प्रकल्प (Automated Rapid Transit System) प्रकल्पाने बाधित झोपडीधारकांच्या पुनर्वसनास मुंबई नागरी परिवहन प्रकल्प (MUTP) पुनर्वसन धोरण लागू करण्यास मान्यता द्यावी. मान्यतेकरीता सविनय सादर.

सदर प्रस्तावास प्राधिकरणाच्या बैठकीत ठेवण्यास मंजुरी मिळावी हि विनंती.

12/02/2026

सहा. स.वि.अ. (श्री सुधीर कांबळे)

समाज विकास अधिकारी (श्री भावेश जोशी) 12-2-2026

उपजिल्हाधिकारी (श्रीमती आखाडे)

अपर जिल्हाधिकारी तथा प्रमुख सा.वि.क 12/2

मा. अतिरिक्त महानगर आयुक्त -२ Submitted for kind approval.

मा. महानगर आयुक्त

क्र.मुंमप्रविप्रा/बैठक/१६०

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),
मुंबई – ४०० ०५१
दिनांक : २७ फेब्रुवारी, २०२६

प्रति,
अप्पर जिल्हाधिकारी (श्री.दावभट)
भूमि व मिळकत शाखा/ अनधिकृत बांधकाम विभाग
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

महोदय,

दिनांक १६ फेब्रुवारी, २०२६ रोजी झालेल्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या १६० व्या बैठकीच्या कार्यवृत्ताचा खालील उतारा पाठवित आहे :-

**बाब क्र.५२ : वांद्रे – कुर्ला संकुलामध्ये स्वयंचलित जलद सार्वजनिक वाहतुक परिवहन (Automates Rapid Transit system) प्रकल्पाने बाधित प्रकल्पग्रस्तांना मुंबई नागरी परिवहन प्रकल्प धोरण (MUTP) लागू करणेबाबत.**

५२.१ उपरोक्त प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे नमूद केले की,

१. मुंबई महानगर प्रदेशामध्ये दर्जेदार पायाभूत सुविधा निर्माण करण्याकरीता प्राधिकरणाने विविध महत्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतले असून त्यापैकी काही प्रकल्प पूर्णत्वास नेले आहेत. प्राधिकरण राबवित असलेल्या प्रकल्पांमध्ये प्रामुख्याने विविध मेट्रो मार्गिका,अटल सेतू, ऑरेंज गेट टनेल, शिवडी-वरळी उन्नत मार्ग इत्यादीचा समावेश आहे.

२. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून वांद्रे-कुर्ला संकुलाचा जागतिक स्तर उंचावण्याच्या वांद्रे व कुर्ला या रेल्वे स्थानकाच्या शक्य तितक्या जवळ जोडणी करण्याच्या दृष्टीने वांद्रे-कुर्ला संकुलात स्वयंचलित जलद सार्वजनिक वाहतुक (Automated Rapid Transit System) ची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने व परिवहनव दळणवळण विभागाच्या माध्यमातून कामे सुरु आहेत.

३. सदर कामासाठी ई-निवीदा मागवण्यासाठी दैनिक सकाळ व दैनिक लोकमत या वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली होती. सदर जाहिरातीच्या अनुषंगाने प्राधिकरणाच्या मा. कार्यकारी समितीच्या मंजूरीने व महानगर आयुक्त यांनी दिलेल्या मान्यतेनुसार मे. साई ग्रीन मोबीलीटी यांची सवलतदार म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे. सदर सवलतदार यांच्याशी करारनामा करण्यात आलेला आहे.

..२/-

४. स्वयंचलित जलद सार्वजनिक वाहतुक प्रकल्प (Automated Rapid Transit System) प्राधिकरणाच्या माध्यमातून सार्वजनिक खाजगी-भागीदारी (PPP) तत्वावर अमंलबजावणी करण्यात येते आहे. प्राधिकरणाच्या परिवहन व दळणवळण विभागाच्यामार्फत सामाजिक विकास कक्षास दि.०१/०८/२०२५ रोजी प्रकल्पबाधितांचे सर्वेक्षण व पुनर्वसन करण्याबाबत कळविलेले आहे.

५. परिवहन व दळणवळण विभागाच्यामार्फत प्राप्त सवलतदार यांच्याशी झालेला करारनामा दि.०९/१०/२०२४ अट क्र.४.१.२ (क) यानुसार सर्वेक्षण कामासाठी येणारा खर्च सवलतदार मे. साई ग्रीन मोबीलीटी हे करणार आहेत असे नमूद आहे

६. प्रकल्पग्रस्तांचे सर्वेक्षण करण्यासाठी स्वतंत्र सर्वेक्षण संस्थेची नेमणूक सवलतदार यांच्या मार्फत करुन त्यांच्या कडून प्रकल्पग्रस्तांचे सर्व्हेक्षण प्राधिकरणाच्या प्रकल्पांसाठी निश्चित केलेल्या सर्व्हेक्षण कार्यपध्दतीनुसार (SOP) नुसार करण्यात येईल याबाबत सवलतदार यांना सर्वेक्षण संस्था नेमणूकीसाठी दि. ०९/०१/२०२६ रोजी पत्र देण्यात आले आहे.सदरील प्रकल्प हा प्राधिकरणाचा महत्वकांक्षी लोकोपयोगी प्रकल्प आहे.

७. सद्याची परिस्थिती पाहता वांद्रे ते कुर्ला या ठिकाणी व्यावसायीक, शासकीय कार्यालये आहेत व सदरील कार्यालयामध्ये दररोज हजारोच्या संख्येने लोक येत असतात लोकांना सुलभ वाहतुकीने प्रवास सुकर होण्याकरीता प्राधिकरणाने हा महत्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला आहे.

८. प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प (MUIP) धोरणाने करावयाचे झाल्यास त्यांची पात्रता केवळ दि. ०१/०१/२००० च्या अर्हतेनुसार आवश्यक असणारी कागदपत्रे जसे की, उदा.विद्युत देयक, झोपडीगणना पावती, महापालिका मालमत्ता कर आकारणी, सहा. निबंधक यांचे कडील भाग प्रमाणपत्र, गुमांस्ता, उपहारगृह लायन्सस इत्यादी कागदपत्रांच्या पडताळणीच्या आधारे करावी लागेल व या प्रक्रियेस वेळ/विलंब होऊ शकतो तसेच जोपर्यंत प्रकल्पग्रस्त पात्र ठरत नाही तोपर्यंत त्यांचे पुनर्वसन करता येणार नाही. अशा परिस्थितीत प्रकल्पाची निकड व महत्व लक्षात घेता या प्रकल्पाने बाधित प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्र. प्रकल्प १७००/सी.आर-३१/स्लम-२, दि. १२/१२/२००० या शासन निर्णयानुसार लागू असलेले मुंबई नागरी परिवहन प्रकल्प (MUTP) धोरण लागू केल्यास प्रकल्पग्रस्तांची पात्रता लवकरात लवकर करुन त्यांचे त्वरीत पुनर्वसन करता येईल व प्रकल्पाचे काम जलद गतीने पूर्ण होईल.



Scanned with OKEN Scanner

५२.२ बाब टिपणीतील मुद्दे, प्रस्तावाचे सादरीकरण यावर विचार करुन व सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा करुन बाब टिपणीतील प्रस्तावास मान्यता देवून प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला आहे.

ठराव क्र १७९९ :-

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्वयंचलित जलद सार्वजनिक वाहतुक प्रकल्प (Automated Rapid Transit System) प्राधिकरणाच्या माध्यमातून सार्वजनिक खाजगी-भागीदारी (PPP) तत्वावर अमंलबजावणी करण्यात येत असल्याने तसेच प्राधिकरणाच्या परिवहन व दळणवळण विभागाच्यामार्फत सामाजिक विकास कक्षास दि.०१/०८/२०२५ रोजी प्रकल्पबाधितांचे सर्वेक्षण व पुनर्वसन करण्याबाबत कळविलेले असल्याने व परिवहन व दळणवळण विभागाच्यामार्फत प्राप्त सवलतदार यांच्याशी झालेला करारनामा दि.०९/१०/२०२४ अट क्र.४.१.२ (क) याच्या अनुषंगाने प्रकल्पबाधितांचे सर्वेक्षण सवलतदार मे. साई ग्रीन मोबीलीटी यांच्यामार्फत करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की"**, सदर सर्वेक्षण प्रकल्पग्रस्तांचे सर्वेक्षण करण्यासाठी स्वतंत्र सर्वेक्षण संस्थेची नेमणूक सवलतदार यांच्या मार्फत करुन त्यांच्या कडून प्रकल्पग्रस्तांचे सर्व्हेक्षण प्राधिकरणाच्या प्रकल्पांसाठी निश्चित केलेल्या सर्व्हेक्षण कार्यपध्दतीनुसार (SOP) नुसार करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की"**,स्वयंचलित जलद सार्वजनिक वाहतुक प्रकल्प (Automated Rapid Transit System) प्रकल्प हा प्राधिकरणाचा महत्वकांक्षी लोकोपयोगी प्रकल्प असल्याने सध्याची परिस्थिती पाहता वांद्रे ते कुर्ला या ठिकाणी व्यावसायीक, शासकीय कार्यालये असल्याने व सदरील कार्यालयामध्ये दररोज हजारोच्या संख्येने लोक येत असतात लोकांना सुलभ वाहतुकीने प्रवास सुकर होण्याकरीता प्राधिकरणाने हा प्रकल्प हाती घेतला आहे. सदर प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प (MUIP) धोरणाने करावयाचे झाल्यास दि. ०१/०१/२००० च्या अर्हतेनुसार आवश्यक असणारी कागदपत्रे जसे की, उदा. विद्युत देयक, झोपडीगणना पावती, महापालिका मालमत्ता कर आकारणी, सहा. निबंधक यांचे कडील भाग प्रमाणपत्र, गुमांस्ता, उपहारगृह लायन्सस इत्यादी कागदपत्रांच्या पडताळणीच्या आधारे करावी लागेल व या प्रक्रियेस वेळ/विलंब होऊ शकतो तसेच जोपर्यंत प्रकल्पग्रस्त पात्र ठरत नाही तोपर्यंत त्यांचे पुनर्वसन करता येणार नसल्याने अशा परिस्थितीत प्रकल्पाची निकड व महत्व लक्षात घेता या प्रकल्पाने बाधित प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन गृहनिर्माण



Scanned with OKEN Scanner

व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्र. प्रकल्प १७००/सी.आर-३१/स्लम-२, दि. १२/१२/२००० या शासन निर्णयानुसार लागू असलेले मुंबई नागरी परिवहन प्रकल्प (MUTP) धोरण लागू मंजूरी देण्यात येत आहे.

"**पुढे असाही ठराव करण्यात येत आहे की**", सदर ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

"प्राधिकरणाच्या बैठकीचे इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता सदर कार्यवाही तात्काळ करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे".

आपली विश्वासू,

सचिव,
कार्यकारी समिती (अ.का.)

Scanned with OKEN Scanner